<u>**नवी मुंबई महानगरपालिका**</u>

महापालिका सचिव कार्यालय,
नवीन मुख्यालय, 3 रा मजला,
बेलापूर, नवी मुंबई - 400 614.
दिनांक 01 एप्रिल 2016.

<u>**निवेदन पत्रिका**</u>

नवी मुंबई महानगरपालिकेच्या सर्व सदस्यांना याद्वारे असे कळविण्यांत येते की, मा. महापौरांनी निश्चित केल्यानुसार, <u>**महानगरपालिकेची एप्रिल 2016 ची सर्वसाधारण सभा बुधवार, दिनांक 20 एप्रिल 2016 रोजी सकाळी 11.00 वाजता बेलापूर, भूखंड क्रमांक 01, सेक्टर 15ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील 5 व्या मजल्यावरील राजमाता जिजाऊ सभागृह**</u> येथे भरेल.

2. महापालिका सदस्यांना अशी विनंती करण्यांत येते की, माहे एप्रिल 2016 च्या सर्वसाधारण सभेत, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 44 अन्वये, आयुक्तांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास असे प्रश्न **(जास्तीत जास्त 5 (पाच) )** आणि ठराव मांडावयाचे असल्यास ठरावाच्या सूचना **(जास्तीत जास्त 3 (तीन) )** <u>**महापालिका सचिव**</u> यांचेकडे खालील तारखांच्या आत सचिव कार्यालयाच्या आवक विभागात पोहोचतील अशा रितीने पाठविण्यांत यावेत :-

1. ठरावाच्या सूचना.
2. महाराष्ट्र म.अधि.कलम 44 अन्वये विचारावयाचे प्रश्न.

} बुधवार, दि. 06 एप्रिल 2016 पर्यंत.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**(चित्रा बाविस्कर)**
**महापालिका सचिव,**
**नवी मुंबई महानगरपालिका.**